# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/05/2023 (शनिवार) दुपार


---

### साहित्य चोरी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा तारणी शिवार येथे दिनांक ११/०५/२०२३ चे १९.३० ते दिनांक १२/०५/२०२३ चे ०६.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– पुरूषोत्तम अण्णाजी खंडाळे, वय ४८ वर्ष, रा. भामेवाडा, ता. कुही, जि. नागपूर हा गणेश मालवतकर, रा. महाल, नागपुर यांच्याकडे शेतमजुर म्हणुन काम करतो. नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीच्या मालकाच्या शेतातील खुल्या गोठयात ठेवलेले लोखंडी सामान, दोन दरवाजे, लोखंडी पलंग, मोटार पंप फुटबॉल, मेन्स स्टार्टर, विहिरीवर मांडलेली मोटार पंप, प्लॅस्टिक ड्रम व प्लॅस्टिक पाईप असा एकुण किंमती अंदाजे १५,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास नापोशी/२०७१ चाचेरकर पो.स्टे. कुही ९९२२९०३४८५ हे करीत आहे.

### जबरी संभोग

पो.स्टे. एमआयडीसी बोरी:– दिनांक ०५.०३.२०१९ ते दिनांक २१.०४.२०२३ चे २१.०० वा. ते २१.३० वा. पुर्वी यातील पिडीत फिर्यादी हिला सन २०२२ मध्ये यातील **आरोपी नामे– १) वारीस हबीब शेख, वय ३० वर्षे, रा. गोसीय मस्जिद बुट्टीबोरी ता. जि. नागपुर** याने अनेक वेळा दुबे प्लाझा लॉज एम. आय. डी. सी. बटुटीबोरी येथे नेवून फिर्यादी सोबत शारिरीक संबंध केले. तेव्हा सुध्दा फिर्यादी आरोपीला तु माझे सोबत कधी लग्न करतो असे म्हणाली तेव्हा तो फिर्यादीला म्हणाला ''तु मेरी तो बिबी है. मुझे थोडा टाईम दे'' असे म्हणून फिर्यादीला टाळाटाळ करत होता. त्यानंतर सन २०२३ मध्ये दिनांक २१/४/२०२३ आरोपीने फिर्यादीला औरंगाबाद अंगुरचा माल आणण्यासाठी म्हणून नेले व तिथे तायडे लॉज येथे नेवून फिर्यादी सोबत शारिरीक संबंध केले. तेव्हा सुध्दा फिर्यादीने आरोपीला लग्नाबाबत विचारले आरोपीने काहीच उत्तर दिले नाही. त्यानंतर आरोपीने फिर्यादीला घरी आणून सोडले व त्यानंतर बुट्टीबोरी सोडून निघून गेला फोन केला तर फोन बंद करून ठेवून फिर्यादीस लग्नास टाळाटाळ करून नकार देत आहे. तरी आरोपी वारीस हबीब शेख वय ३० वर्षे रा. गोसीय मस्जीद बुट्टीबोरी ता. जि. नागपुर यांनी फिर्यादीला लग्न करतो म्हणून वारंवार जबरदस्तीने शारिरीक संबंध केले व आरोपीचा भाऊ नामे –सरफराज हबीब शेख वय २८ वर्षे रा. गोसीय मस्जीद बुट्टीबोरी ता. जि. नागपुर याने फिर्यादीला तुझी बदनामी करतो म्हणून सालाई ढाब्याजवळ जबरदस्तीने शारिरीक संबंध केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७६(२)(एन) भा.द.वी. सहकलम ३(१) (डब्लु) (I), ३(१) (डब्लु) (II) ३(२) (५) अ. जा. ज. अ. प्र. का. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक भिमाजी पाटील पोस्टे बोरी अति. चार्ज एमआयडीसी बोरी हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर